सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

सेतू-अभ्यास

Bridge-Course

इयत्ता – तिसरी

विषय – मराठी

(द्वितीय भाषा)

सुलभभारती

शैक्षणिक वर्ष २०२१-२२

ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

सेतू –अभ्यास (ब्रिज कोर्स) इयत्ता – तिसरी

- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण विभाग ,महाराष्ट्र शासन
- **प्रकाशक** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र ,पुणे.
- **प्रेरणा** : **मा.वंदना कृष्णा (भा.प्र.से.)**
  अपर मुख्य सचिव ,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग ,मंत्रालय ,मुंबई.
- **मार्गदर्शक** : **मा. विशाल सोळंकी (भा.प्र.से.)**
  (आयुक्त शिक्षण) महाराष्ट्र राज्य ,पुणे.
  मा.राहुल द्विवेदी (भा.प्र.से.)
  राज्य प्रकल्प संचालक ,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद ,मुंबई.
- **संपादक** : **मा. दिनकर टेमकर**
  संचालक ,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र ,पुणे.
- **सहसंपादक** : **डॉ. विलास पाटील**
  सहसंचालक ,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र ,पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **डॉ.कमलादेवी आवटे,** उपसंचालक (भाषा व समता विभाग)
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र ,पुणे.
  नीता जाधव ,उपविभागप्रमुख तथा अधिव्याख्याता, मराठी विभाग
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र ,पुणे.
- **संपादन सहाय्य** : **डॉ.नंदा भोर, अश्विनी नरवणे** ,विषय सहायक ,मराठी विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र ,पुणे.
- **निर्मिती गटप्रमुख** : **डॉ. बाबासाहेब बडे, अधिव्याख्याता ,**
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,नाशिक
- **निर्मिती गटसदस्य** :
  १) **समाधान शिकेतोड** ,विषय सहायक, जि.शि.व प्र.सं. ,उस्मानाबाद.
  २) **ज्ञानेश्वरी परदेशी** ,सहायक शिक्षक, जि.प.प्रा.शाळा पवारवस्ती लोहगाव ता. हवेली जि.पुणे
  ३) **आशा सकट** ,सहायक शिक्षक, जि.प.प्रा.शाळा कोयाळी पुनर्वसन शिक्रापूर ता. शिरूर जि.पुणे
  ४) **उमेश खोसे,** सहायक शिक्षक, जि. प. प्राथमिक शाळा, जगदंबानगर, कडदोरा ता. उमरगा, उस्मानाबाद
  ५) **परेश पडोळकर** ,विषय सहायक, जि. शि. व प्र. संस्था, बुलढाणा.

विद्यार्थ्यांशी हितगुज

विद्यार्थी मित्रांनो ,

मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही ऑनलाइन व इतर विविध मार्गाने तुमचं शिक्षण सुरू ठेवलंततुमच खूप . या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला काही दिवस आपणाला मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमाची उजळणी .खूप कौतुक व्हावी आणि या वर्षीच्या इयत्तेच्या अभ्यासासाठी आपली पूर्वतयारी व्हावीहा ,ही पूर्वतयारी करणे सोयीचे व्हावे , मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही नेमके काय शिकला हे समजण्यासाठी .सेतू अभ्यास तयार करण्यात आला आहे त्यासाठी तुम्ही .आणि पुढील इयत्तेचा पाठ्यक्रम समजून घेण्यासाठी हा सेतू अभ्यास तुम्हाला मदत करणार आहे कायकरायचे?

एकूण ४५ दिवसाचा हा अभ्यास तुमच्यातील भाषिक कौशल्ये विकसित होण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आला आहेत्यासाठी प्रत्येक दिवशी दिलेला भागाचा अभ्यास करून त्यामध्ये दिलेल्या कृतींच्या उत्तरांचे लेखन . यात दिवसनिहाय तय .तुमच्या वहीत करावयाचे आहे◌ार केलेल्या कृतींचा समावेश आहेदिलेल्या . कृती सोडवताना अडचण आल्यास शिक्षक किंवा पालकांची मदत .नियोजनाप्रमाणे कृती स्वप्रयत्नाने सोडवाव्यात .घ्या

जाणून घेऊ यासराव करू या संबोधाने तुमच्याशी प्रत्यक्ष शक्य नाही तरी अप्रत्यक्ष संवाद ,सक्षम बनू या , साध◌ायचा प्रयत्न केला आहेतसेच ,जाणून घेऊ या मध्ये असलेल्या कृती सहज सोडवता येतील अशा आहेत . सक्षम बनू या मधील आशय समजून घेताना व कृती सोडवताना तुम्ही आपल्या पालकांची किंवा शिक्षकांचे .सराव करू या मधील कृती मात्र स्वप्रयत्नाने सोडवा.मार्गदर्शन घ्या

तुम्ही चौदा दिवस या सेतूचा अभ्यास केल्यानंतर पंधराव्या दिवशी तुम्हाला एक चाचणी दिली आहेती सोडवून . याप्रमाणे तिसाव्या दिवशी आणि शेवटी पंचेचाळीसाव्या दिवशी अशा तीन .आपल्या शिक्षकांकडून तपासून घ्या दिलेल्या नियोजनानुसार येणाऱ्या चाचण्या सोडवा .चाचण्या सोडवायच्या आहेतव उत्तरांची खात्री आपल्या शिक्षकांकडून करून घ्या .

हा सेतू अभ्यास यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी मन! पूर्वक शुभेच्छा:

शिक्षक पालकांसाठी सूचना /

कोविड 19 च्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे मागील शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष विद्यार्थी समोर असताना वर्ग अध्यापन होऊ शकले नाहीनव्या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष शाळा कधी सुरू होतील याबाबत . मागील शैक्षणिक वर्षात आपण ऑनलाइन माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण .अनिश्चितता आहे .पोहोचवण्यासाठी विविध प्रयत्न केलेत**मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची उजळणी व्हावी तसेच नवीन शैक्षणिक वर्षात शिकाव्या लागणाऱ्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी हा दुहेरी उद्देश ठेवून हा सेतू अभ्यास तयार करण्यात आला आहे.**

- सेतू अभ्यास एकूण ४५ दिवसांचा असून त्यात ठराविक कालावधीनंतर घ्यावयाच्या एकूण तीन चाचण्यांचा समावेश आहे.
- सेतू अभ्यास हा मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमावर आधारित असून मागील इयत्तेचा पाठ्यक्रम व सध्याच्या इयत्तेचा पाठ्यक्रम यांना जोडणारा दुवा आहे.
- सदर अभ्यास हा इयत्तानिहाय व विषयनिहाय तयार करण्यात आला असून तो मागील इयत्तेच्या पाठ्यपुस्तकाशी संलग्न व त्यातील घटकांवर आधारित आहे.
- सदर सेतूअभ्यासात क्षेत्रक्षमता विधाने यांचा समावेश केला /संकल्पना व अध्ययन निष्पत्ती,कौशल्य, .विद्यार्थ्यांना नेमके काय मार्गदर्शन करायचे आहे यासाठी मदत होईल.आहे
- ‘ ,न घेण्यासाठीमध्ये संबंधित संकल्पनेबाबत विद्यार्थ्याचे पूर्वज्ञान जाणू ’जाणून घेऊ या‘जाणून घेऊ या ’ **’सक्षम बनू या‘** मधील संकल्पनेबाबत त्याने अधिक सक्षम व्हावे यासाठी मिळालेल्या माहितीचे किती आकलन झाले यासाठी **’सराव करू या‘** व सराव करू यामध्ये मिळालेल्या माहितीच्या आधारे

विद्यार्थ्याने आधी चिकित्सक विचार करावाअर्थात उच्च बोधात्मक क्षमतांच्या ,सर्जनशील व्हावे, विकासासाठी**काही कृतींचा समावेश केला आहे.**या सदरांचा समावेश केला आहे. .

- संकल्पना अधिक चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी मदत हवी म्हणून दीक्षा ॲपक्यु आर कोड , .ची मदत घ्यावी.इ
- .तू अभ्यास दिवसनिहाय नियोजनाप्रमाणे पूर्ण करून घ्यावाशिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून सदरचा से .
- चला सराव करू या हे सदर विद्यार्थी स्वप्रयत्नाने सोडवेल याकडे शिक्षकांनी लक्ष द्यावेआवश्यक तेथे , विद्यार्थ्यांनामार्गदर्शन करावे.
- निश्चित केलेल्या कालावधीनंतर घ्यावयाच्या चाचण्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यातचाचण्या , .तपासून विद्यार्थीनिहाय गुणांची नोंद स्वतःकडे ठेवावी
- चाचणी तपासताना विद्यार्थीनिहाय विश्लेषण करून मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त पूरक मदत करावी.

मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थी नेमके काय शिकले हे समजण्यासाठीत्याची चाचपणी करण्यासाठी , आणि विद्यार्थ्यांना पुढील इयत्तेतील संकल्पना समजून घेण्यासाठी व अध्ययनासाठी हा सेतू अभ्यास अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे ,महाराष्ट्र ,

सेतू -अभ्यास

इयत्ता – तिसरी **विषय –मराठी** **कालावधी – ४५ दिवस**

➢ उद्दिष्टे-:

1. कोविडच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या मनात अध्ययनाविषयी आत्मविश्वास निर्माण करून त्यांना शिकण्यासाठी आनंददायी वातावरणाची निर्मिती करणे.
2. विद्यार्थ्यांना गत शैक्षणिक वर्षातील संबंधित इयत्तेच्या भाषा अध्ययनातील अंतर भरून काढण्यास मदत करणे.
3. विद्यार्थ्यांना मागील इयत्तानुरूप भाषा विषयातील अपेक्षित अध्ययन निष्पत्तीनुसार समजपूर्वक वाचनाची संधी उपलब्ध करून संबंधित क्षमता वृद्धिंगत होण्यास मदत करणे.
4. विद्यार्थ्यांना मागील इयत्तेशी जोडून घेण्यासाठी स्वयंअध्ययनासाठी उपयुक्त अशा आनंददायी व कृतियुक्त आशयाची निर्मिती करणे.
5. विद्यार्थ्यांना अभिव्यक्त .होण्याची संधी उपलब्ध करून देणे (लेखन)

➢ अपेक्षित क्षेत्र:-

1. श्रवण
2. भाषण संभाषण
3. वाचन

अनुक्रमणिका

दिवस	क्षेत्र/ कौशल्य / संकल्पना	पृष्ठ क्रमांक	दिवस	क्षेत्र/ कौशल्य / संकल्पना	पृष्ठ क्रमांक
१	ऐकूण कृती करणे	८	२४	चित्र काढून त्यावर बोलणे.	२१
२	आवाज ओळखणे	८	२५	घटनाक्रम सांगणे	२१
३	कृतियुक्त गाणी	९	२६	अनौपचारिक गप्पा	२२
४	अंकज्ञान	९	२७	औपचारिक गप्पा	२२
५	आवाज ओळखून ठिकाण ओळखा	१०	२८	अपूर्ण गोष्ट पूर्ण करणे.	२३
६	ऐका व ओळखा	१०	२९	नाट्यीकरण	२३
७	ऐकुया / सांगुया कशासाठी काय ?	११	३०	**चाचणी क्रमांक – २**	२४
८	सारखे काय ?	१२	३१	अपूर्ण गोष्ट पूर्ण करणे	२५
९	विविध वस्तूंचे ध्वनी ऐकवणे ,ओळखणे	१३	३२	नाट्यीकरण	२५
१०	प्राणी,पक्षी इत्यादींचे आवाज ऐकवणे ओळखणे .	१३	३३	आवडीच्या खेळाबद्दल माहिती सांगणे	२६
११	गाणी ,बडबडगीते ,संवाद ऐकवणे	१४	३४	चित्र गप्पा	२६
१२	गोष्ट ऐकवणे,गोष्टी वाचून दाखवणे	१४	३५	शाळेबद्दल, स्वतः बद्दल बोलणे	२७
१३	सहभागी वाचन (गोष्ट ऐकवणे.)	१५	३६	चित्र वर्णन	२७
१४	संवाद ,नाटुकली ऐकवणे ,वाचून दाखवणे	१५	३७	चित्र वाचन	२८
१५	**चाचणी क्रमांक – १**	१६	३८	कथावाचन	२९
१६	खेळ	१७	३९	चित्राच्या जागी शब्द ठेवून वाचन	३०
१७	शब्दखेळ	१७	४०	व्यावसायिकाला प्रश्न विचारणे	३१
१८	गोष्ट ऐकविणे	१८	४१	कविता वाचन	३२
१९	बडबड गीतांचे गायन	१८	४२	शब्द डोंगर	३३
२०	प्राण्यांचे चित्र पाहून आवाज काढणे	१९	४३	प्रकट वाचन	३४
२१	वस्तूबद्दल बोलणे.	१९	४४	तक्ता / दिनदर्शिका	३५
२२	पाठ्यपुस्तकातील पावसाच्या गीताचे गायन	२०	४५	**चाचणी क्रमांक – ३**	३६
२३	चित्र दाखवून संवाद घडवणे	२०			

दिवस१-

क्षेत्र – :श्रवण

संकल्पना /संबोध -:ऐकूण कृती करणे.

- **जाणून घेऊया -:**
  - शिक्षकांनी,पालकांनी मुलांना विविध सूचना द्याव्यात. त्याप्रमाणे कृती करायला सांगाव्यात.
  - सूचना सोप्या व समजण्यास / कृती करण्यास सहज असाव्यात.
- **सक्षम होऊया -:**
  - मुलांना काही कृती / सूचना देऊन त्याप्रमाणे कृती करून घ्याव्यात.
    उदा – चाला, पळा, वाका, टाळी वाजवा, उडी मारा, खळी बसा, हात वर कर, लंगडी घाला ई.
  - मुले योग्य शब्द ऐकून त्यावर योग्य कृती करतात का ? याकडे लक्ष द्यावे.
- **सराव करूया -:**
  - शिक्षकांनी सूचना देण्याची संधी मुलांना द्यावी.
    जसे की – मुलांमधूनच एकाची निवड करून त्या विद्यार्थ्याने इतरांना सूचना द्याव्यात.
  - राजा म्हणतो / शिवाजी म्हणतो / / डोंगराला आग लागली पळा पळा यासारखे खेळ घ्यावेत .

दिवस- 2

क्षेत्र – :श्रवण

संकल्पना /संबोध -:आवाज ओळखणे

- **जाणून घेऊया -:**
  - शिक्षक पालक,यांनी मुलांना विविध वाद्याचे आवाज ऐकवावेत.
  - यासाठी मोबाईल / खरी वाद्ये / टी.व्ही याचा उपयोग करावा.
- **सक्षम होऊया -:**
  - मुलांना आवाज ऐकवल्यावर त्यांना ते वाद्य ओळखण्यास सांगावे.
  - मुलांनी वाद्य ओळखल्यावर त्या वाद्याबाद्दल प्राथमिक माहिती मुलांना व्हावी यासाठी चर्चा करावी.
- **सराव करूया -:**
  - वर्गातील काही मुलांना वाद्य वाजवता येतात का ? याची माहिती घ्यावी.
  - उपलब्ध साहित्यातूनही संगीत निर्मिती करून कवितांचे गायन घ्यावे.

दिवस- ३

क्षेत्र – :श्रवण

संकल्पना /संबोध -:कृतियुक्त गाणी

- **जाणून घेऊया -:**
  - शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कृतियुक्त बालगीते ऐकवावीत.
  - गीत ऐकताना मुलांना उत्स्फुर्तपणे कृती करण्यास प्रेरणा द्यावी.
- **सक्षम होऊया -:**
  - कृतियुक्त बालगीत ऐकवताना त्यातील कृती समजून घेऊन विद्यार्थ्यांनी कराव्यात यासाठी प्रयत्न करावेत.
    जसे की – नाच रे मोरा या गाण्यातील शब्दांप्रमाणे कृती करून घ्याव्यात.
    ससा तो ससा, सांग सांग भोलानाथ, एका माकडाने काढले दुकान ई. कृतियुक्त बालगीते ऐकून त्यावर कृती करण्याची संधी द्यावी.
- **सराव करूया -:**
  - मुलांना गटात / वैयक्तिक बालगीतावर नृत्य करण्याची संधी द्यावी.
  - बालगीत ऐकून ते म्हणण्याची स्पर्धा घ्यावी. (बालगीत पाठांतर स्पर्धा)

दिवस – ४

क्षेत्र – :श्रवण

संकल्पना /संबोध -:अंकज्ञान

- **जाणून घेऊया -:**
  - शिक्षकांनी / पालकांनी मुलांना तोंडी १ ते १० अंक सांगावेत.
  - अंकज्ञानासाठी सूचना द्याव्यात.
    जसे की – दोन पेन दे
    चार चॉकलेट आण
    तीन फोडी घे याप्रमाणे
- **सक्षम होऊया -:**
  - मुलांना सूचना देऊन तो अंक ते नीट ऐकून त्याप्रमाणे वस्तू आणतात का? याकडे लक्ष द्यावे.
  - अंक उलट सुलट क्रमाने ऐकवून पुढचा मागचा अंक विचारणे.
- **सराव करूया -:**
  - अंकाचे गाणे ऐकवावे .
  - मुलांमधील गटनायक निवडून गटागटात अंकाप्रमाणे वस्तू आणण्याचा खेळ घ्यावा.

दिवस – ५

क्षेत्र – :श्रवण

संकल्पना /संबोध -:सूचना / आवाज ऐकून ठिकाण ओळखा.

- **जाणून घेऊया -:**
  - शिक्षकांनी / पालकांनी मुलांना मोबाईलच्या मदतीने रेल्वे स्टेशन, बस स्टेशन, विमानतळ, वाहनतळ, बाजार, रिक्षा स्टँन्ड ई. वरील सूचना / आवाज ऐकवावेत.
  - आवाज व सूचना स्पष्ट ऐकू येतील अशा असाव्यात.
- **सक्षम होऊया -:**
  - रेल्वे स्टेशन, भाजी मंडई, विमानतळ, एस.टी. स्थानक येतील विशिष्ट प्रकारच्या सूचना मुलांना ऐकवून ती ठिकाणे मुलांनी ओळखल्यावर त्यावर आधारित अधिक चर्चा घ्यावी.
  - त्या त्या ठिकाणी वापरले जाणारे विशिष्ट शब्द मुलांना विचारावेत जसे की – प्लँटफॉर्म, पार्किंग, लँडीग, टेकऑफ, रन वे, सीट बेल्ट ई.
- **सराव करूया -:**
  - अशा प्रकारच्या सूचना ऐकून मुलांना स्वतःला त्या सूचना देण्यास सांगावे.
  - अशा सूचनांचा संग्रह करावा.

दिवस – ६

क्षेत्र – :श्रवण

संकल्पना /संबोध -:ऐका व ओळखा

- **जाणून घेऊया -:**
  - शिक्षकांनी / पालकानी मुलांना घरातील / वर्गातील विविध वस्तूंचे नाव घेऊन त्या आणावयास सांगावे. जसे की – डस्टर, कुकर, झाडू, चमचा, बरणी, तक्ता, पेन ई.
- **सक्षम होऊया -:**
  - घरातील / वर्गातील परिचित – अपरिचित वस्तूंची नावे सांगून त्या वस्तू आणायला सांगितल्यावर मुलांना त्या वस्तूविषयी अधिक बोलते करावे.
    जसे की – या वस्तूचा उपयोग काय ? कशापासून बनली आहे ?
  - या वस्तू व त्यांची नावे यांच्या जोड्या लावून घ्याव्यात.
  - श्रवण – वाचन – लेखन घ्यावे.
- **सराव करूया -:**
  - मुलांना सातत्याने नवनवीन वस्तू सांगून त्यांचा शब्दसंग्रह वाढवत न्यावा.
  - नव्याने कळलेले शब्द, वस्तू यांची नोंद करून ठेवायला सांगावी.

दिवस – ७

क्षेत्र – :श्रवण

संकल्पना /संबोध -:ऐकुया, सांगूया कशासाठी काय ?

- **जाणून घेऊया -:**
  - शिक्षकांनी / पालकांनी मुलांना विविध कृती ऐकवाव्यात व त्यासाठी कोणता अवयव उपयोगी पडतो हे विचारावे.
  - जसे की – ऐकण्यासाठी :-

    पाहण्यासाठी :-

    श्वास घेण्यासाठी / वास घेण्यासाठी :-

    काम करण्यसाठी :-

    फुटबॉल खेळण्यासाठी :-

    अन्न चावण्यासाठी :-
- **सक्षम होऊया -:**
  - मुलांना विविध कृती ऐकवून योग्य त्या अवयवाचे मुलांनी नाव सांगितल्यावर शिक्षकांनी शरीराच्या विविध अवयवांची व ऐकून ते अवयव दाखवावेत.
  - जसे की – डोके, डोळे, कान, भुवया, हनुवटी, हात, पोट, खांदा, पाय ई.
- **सराव करूया -:**
  - अवयवांचे उपयोग सांगणारे बालगीत ऐकवावे.
  - अवयवांचे उपयोग व महत्त्व यावर चर्चा घ्यावी.
  - अवयवांची मराठी नावे कार्डवरून लिहून टी आकृतीला चिकटवावीत.

दिवस – ८

क्षेत्र – :श्रवण

संकल्पना /संबोध -:सारखे काय ?

- **जाणून घेऊया -:**
  - शिक्षकांनी / पालकांनी मुलांना शब्दांचे विविध गट ऐकवावेत.
  - या शब्द गटातील सारखे अक्षर ऐकून ओळखण्यास सांगावे.
  - जसे की – **आ**ई
    आजी
    आबा
    } या शब्द गटात ‘ आ ‘ समान आहे.
- **सक्षम होऊया -:**
  - शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध शब्दगट ऐकवावेत.
  - प्रत्येक शब्दगटातील समान आलेल्या अक्षराचा स्पष्ट उच्चार विद्यार्थ्यांना ऐकवावा.
  - या अक्षरांचे फळ्यावर लेखन करावे, वाचन घ्यावे.
- **सराव करूया -:**
  - वेगवेगळी शब्दकार्डे मुलांना दाखवून त्यावरचे शब्द ऐकवावेत. ज्या ज्या वाचन कार्डावरील अक्षरे समान ऐकू येतील त्यांना गोल करावा.
  - यमक जुळणारे शब्द विचारावेत.
    जसे की – ऐक व सारख्या उच्चारांचा शब्द सांग.
    1. सुई – जुई
    2. आई – माई यාप्रमाणे .....

दिवस – ९

क्षेत्र :- श्रवण ,भाषण-संभाषण

संकल्पना / संबोध :-विविध वस्तूंचे ध्वनी ऐकवणे ,ओळखणे .

- **जाणून घेऊया :-**
  - शिक्षकांनी मुलांना विविध प्रकारचे ध्वनी ऐकवावेत.उदा.वाहने ,घुंगरू ,ढोल,तबला,ध्वनिमुद्रित आवाज इ .आवाज ऐकवावेत .
- **सक्षम होऊ या :-**
  - मुलांसोबत ऐकवलेल्या ध्वनीबाबत चर्चा करावी
  - कोणत्या प्रकारचे ध्वनी ऐकवले ,कशा प्रकारचा आवाज होता यासारखे प्रश्न विचारून मुलांना बोलते करावे.
- **सराव करू या :-**
  - शिक्षक पालक यांनी मुलांना उपलब्ध साहित्याचे ध्वनी ऐकवावेत .मुलांना आवाज ओळखायला सांगावा.
  - स्थूल /सूक्ष्म आवाजातील फरक मुले ओळखतात का याकडे लक्ष द्यावे.
  - आवाजातील साम्यभेद ओळखता येतो का ते पाहावे.

दिवस – १०

क्षेत्र :- श्रवण ,भाषण-संभाषण

संकल्पना / संबोध :-प्राणी,पक्षी इत्यादींचे आवाज ऐकवणे ,ओळखणे .

- **जाणून घेऊया :-**
  - शिक्षकांनी मुलांना विविध प्रकारचे ध्वनी ऐकवावेत.उदा.मोबाईल,संगणक इ.च्या माध्यमातून प्राणी,पक्षी इत्यादींचे आवाज मुलांना ऐकवावेत .
  - विद्यार्थी आवाज लक्षपूर्वक ऐकतात का याकडे लक्ष द्यावे.
- **सक्षम होऊ या :-**
  - मुलांसोबत ऐकवलेल्या ध्वनीबाबत चर्चा करावी.
  - कोणत्या प्रकारचे ध्वनी ऐकवले ,कशा प्रकारचा आवाज होता यासारखे प्रश्न विचारून मुलांना बोलते करावे.
- **सराव करू या :-**
  - शिक्षक पालक यांनी मुलांना विविध प्रकारे ध्वनी ऐकवावेत .मुलांना आवाज ओळखायला सांगावा.
  - सुरुवातीला परिसरातील प्राणी ,पक्षी यांचे आवाज ऐकवावेत.
  - आवाजातील साम्यभेद ओळखता आला कि पुढे उच्चारातील साम्यभेद समजण्यासाठीचि तयारी होईल.

दिवस – ११

क्षेत्र :- श्रवण ,भाषण-संभाषण

संकल्पना / संबोध :-गाणी ,बडबडगीते ,संवाद ऐकवणे

- **जाणून घेऊया :-**
  - शिक्षकांनी मुलांना विविध प्रकारची बडबडगीते ,गाणी साभिनय म्हणून दाखवावीत .
  - विद्यार्थी बडबडगीते ,गाणी लक्षपूर्वक ऐकतात का याकडे लक्ष द्यावे.
- **सक्षम होऊ या :-**
  - मुलांसोबत ऐकवलेल्या गाणी ,गीतांवर चर्चा करावी,म्हणायला सांगावे.
  - बडबडगीतांमध्ये उच्चारांची गंमत,शब्दांची पुनरावृत्ती असेल याची काळजी घ्यावी.
- **सराव करू या :-**
  - शब्दांची , उचारांची गंमत अनुभवायला मिळेल आणि
  - मुलांना भाषेतील आवाजांची जाण विकसित होण्यास मदत होईल .

दिवस – १२

क्षेत्र :- श्रवण ,भाषण-संभाषण

संकल्पना / संबोध :-गोष्ट ऐकवणे,गोष्टी वाचून दाखवणे .

- **जाणून घेऊया :-**
  - शिक्षकांनी मुलांना विविध प्रकारच्या मुलांच्या भावविश्वातील गोष्टी ऐकवाव्यात ,वाचून दाखवाव्यात.
  - ऐकलेल्या गोष्टीला अनुसरून चित्र रेखाटायला सांगावे.त्यामुळे बोटांच्या स्नायूंवर नियंत्रण येण्यास मदत होईल.
- **सक्षम होऊ या :-**
  - मुलांसोबत ऐकवलेल्या गोष्टीवर एखादा छोटा प्रश्न विचारावा म्हणजे त्यांनी लक्षपूर्वक ऐकले कि नाही ते समजेल .
  - गोष्टीतून मुलांना आनंद मिळेल याची काळजी घ्यावी .
- **सराव करू या :-**
  - गोष्टीतील गंमत अनुभवायला मिळेल आणि
  - स्वतःचे विचार ,भावना चित्रातून ,मांडण्याची संधी मुलांना मिळेल.

दिवस – १३

क्षेत्र :- श्रवण ,भाषण-संभाषण

संकल्पना / संबोध :- सहभागी वाचन (गोष्ट ऐकवणे.)

- **जाणून घेऊया :-**
- शिक्षकांनी,पालकांनी मुलांना विविध प्रकारच्या मुलांच्या भावविश्वातील आवडीच्या विषयावरील मजकूर कमी व चित्रे जास्त असलेले गोष्टीचे पुस्तकातून गोष्टी ऐकवाव्यात ,वाचून दाखवाव्यात.
- ऐकलेल्या गोष्टीमध्ये ,मजकुरावर बोट ठेवून पुढे काय बर झालं असेल? याचा अंदाज बांधायला लावणारे प्रश्न विचारावेत.
- **सक्षम होऊ या :-**
- पुस्तक वाचून दाखवताना पुस्तकाचे नाव,किंमत ,मुखपृष्ठ ,मलपृष्ठ या बाबी दाखवाव्यात .
- गोष्टीतून मुलांना आनंद मिळतो आणि डावीकडून वाचले जाते हे सांगावे.
- **सराव करू या :-**
- गोष्टीतील गंमत अनुभवायला मिळेल आणि
- लेखी मजकुराची जाणीव होते .
- गोष्टीची छोटी छोटी पुस्तके उपलब्ध करून वाचून दाखवावीत.

दिवस – १४

क्षेत्र :- श्रवण ,भाषण-संभाषण

संकल्पना / संबोध :- संवाद ,नाटुकली ऐकवणे ,वाचून दाखवणे

- **जाणून घेऊया :-**
- शिक्षकांनी,पालकांनी मुलांना विविध प्रकारच्या मुलांच्या भावविश्वातील आवडीच्या विषयावरील संवाद ,नाटुकली ऐकवावी .वाचून दाखवावी.
- ऐकलेल्या संवादामध्ये ,नाटुकलीवर आधारित छोटे एक ,दोन प्रश्न विचारावे.
- **सक्षम होऊ या :-**
- संवाद वाचून दाखवताना किंवा ऐकविताना आवाजातील चढ उतार या या बाबीकडे लक्ष वेधून घ्यावे.
- संवादात एकपेक्षा जास्त व्यक्तींमध्ये असतो हे मुलांना लक्षात आणून द्यावे.
- नाटुकली असेल तर त्यात हावभाव असतात हे मुलांच्या लक्षात आणून द्यावे.
- **सराव करू या :-**
  - दोन –दोन मुलांचे गट करून एकमेकात आवडीच्या विषयावर गप्पा मारायला सांगाव्यात.
  - नाटुकली वाचून दाखवावी,येत असेल तर सादर करण्याची संधी द्यावी.

दिवस – १५

सेतू अभ्यास चाचणी क्रमांक १

शाळेचे नाव: --

विद्यार्थ्याचे नाव : --

इयत्ता --तिसरी **विषय -मराठी** **गुण १०**

दिनांक / /२०२१

१] ‘ म ’ अक्षर पाहा. म अक्षराला गोल कर . **गुण १**

सोमवार काम

म

कमला मगर

२) शब्द पाहा व सुंदर अक्षरात लिही. **गुण १**

काम मामा

---------------------- ------------------

---------------------- ------------------

3) तुझ्या आवडीचे चित्र काढ. **गुण २**

४) चित्र बघ व नाव सांग. **गुण २**

५) तुझ्या आवडीचे बडबडगीत म्हण . **गुण १**

६)तुला आवडणारी गोष्ट सांग . **गुण १**

७) स्वत:बद्दल २-3 वाक्ये सांगा . **गुण १**

८) जेवढे शब्द तेवढ्या टाळ्या वाजव. **गुण १**

१. कमल पाऊस बघ .
२. रोप वाढले .

दिवस – १६

क्षेत्र :- श्रवण ,भाषण-संभाषण

संकल्पना / संबोध :- खेळ

- **जाणून घेऊया :-**

- शिक्षकांनी,पालकांनी मुलांना विविध प्रकारचे खेळ खेळायला सांगावेत.उदा.उड्या मारणे, बेडूक उडी ,ससा उडी,कोलांटी उडी इ .
- परिसरातील खेळानुसार खेळ वेगळे असले तरी चालतील.
- **सक्षम होऊ या :-**
    - स्नायूंवर नियंत्रण व हालचालींमध्ये समन्वय साधण्यास मदत होईल त्याकडे लक्ष द्यावे.
    - मेंदूला आव्हान व एकाग्रता वाढेल .
    - सूचना ऐकून कृती करणे ,निरीक्षण करणे या क्षमतांच्या विकासास मदत होते.
- **सराव करू या :-**
    - मुलांचे गट करून वरील प्रकारचे खेळ खेळण्यास सांगावे.

दिवस – १७

क्षेत्र :- श्रवण ,भाषण-संभाषण

संकल्पना / संबोध :- शब्दखेळ

- **जाणून घेऊया :-**

- शिक्षकांनी,पालकांनी मुलांना विविध प्रकारचे शब्द सांगावेत. उदा. टेबल हा शब्द ऐकून मुलांनी तीन टाळ्या वाजवाव्यात.
- शब्दातील प्रत्येक ध्वनींसाठी एक टाळी असा खेळ घ्यावा.
- **सक्षम होऊ या :-**
    - ऐकून टाळी वाजवणे त्यामुळे मेंदू व अवयव यात समन्वय साधण्यास मदत होईल, त्याकडे लक्ष द्यावे.
    - मेंदूला आव्हान मिळेल व एकाग्रता वाढेल .
    - सूचना ऐकून कृती करणे या क्षमतांच्या विकासास मदत होते.
- **सराव करू या :-**
    - मुलांचे गट करून वरील प्रकारचा खेळ खेळण्यास सांगावे.
    - छोटे शब्द व टाळ्या याचा सराव झाल्यावर ,छोटे वाक्य देखील सांगून त्या वाक्यात जेवढे शब्द तेवढ्या टाळ्या वाजविण्यास हळूहळू सराव घ्यावा.

दिवस – १८

क्षेत्र – :श्रवण , भाषण – संभाषण
संकल्पना /संबोध -:गोष्ट ऐकवणे

- **जाणून घेऊया -:**
  - शिक्षकांनी,पालकांनी मुलांना ससा व कासवाच्या शर्यतीची गोष्ट तोंडी सांगावी किंवा या गोष्टीचा ऑडिओ ऐकवावा .
  - गोष्ट सांगताना ओघवत्या शैलीत गोष्ट सांगावी.
  - मुलांना गोष्ट ऐकण्याचा निखळ आनंद मिळावा. गोष्टीचे तात्पर्य विचारू नये.
- **सक्षम होऊया -:**
  - मुलांसोबत ऐकलेल्या गोष्टीबाबत चर्चा करावी.
  - गोष्टीत पात्रे कोणती आहेत.याबाबत बोलते करावे.संवाद काय आहेत.
- **सराव करूया -:**
  - शिक्षक,पालक यांनी मुलांच्या आवडीच्या विषयावरच्या गोष्टी सांगाव्यात .
  - मुलांनी घरच्या भाषेत गोष्टी सांगितल्या तरी त्याचा स्वीकार करावा .
  - मुलांना बोलण्यासाठी प्रेरित करावे.या गोष्टीच्या पुढे काय घडले असेल याबद्दल विचारावे.
    जसे– कासव आणि ससा यांची पुन्हा शर्यत लागली असेल का ?

दिवस – १९

क्षेत्र – :श्रवण – भाषण,संभाषण
संकल्पना / संबोध : बडबडगीतांचे गायन

- **जाणून घेऊया -:**
  - शिक्षक पालक,यांनी मुलांना बडबडगीतांचे ऑडिओ ऐकवावे.
  - मुलांसोबत बडबडगीतांचे गायन करावे.
- **सक्षम होऊया -:**
  - शिक्षक पालक,यांनी स्थानिक बडबडगीतांचे संकलन करून करावे.
  - मुलांना आवडणाऱ्या गीतांचे गायन करण्याची संधी द्यावी.त्यावर चर्चा करावी.
- **सराव करूया -:**
  - वेगवेगळ्या चालीत बडबडगीतांचे गायन करावे.
  - मुलांना स्वत: चाल लावण्याची संधी द्यावी.बडबडगीते गाण्याचा,ऐकण्याचा निखळ आनंद द्यावा

दिवस – २०

क्षेत्र – :भाषण – संभाषण

संकल्पना /संबोध-:प्राण्यांचे चित्र पाहून आवाज काढणे

- **जाणून घेऊया -:**
  - शिक्षकांनी,पालकांनी मुलांना त्यांच्या ओळखीच्या प्राण्यांची चित्रे दाखवावीत.
  - चित्राविषयी माहिती विचारावी.त्यांचे आवाज ऐकून दाखवावेत.
- **सक्षम होऊया -:**
  - मुलांसोबत परिसरातील प्राण्यांबाबत चर्चा करावी काही.चित्रे दाखवावीत.
  - शिक्षक पालकांनी त्यांना चित्र दाखवून त्या प्राण्यांचे आवाज काढण्यास सांगावे.
- **सराव करूया -:**
  - शिक्षक,पालक यांनी मुलांना प्राण्यांच्या आवाजाचे काल्पनिक संवाद सादर करण्यास सांगावे.
  - मुलांनी काढलेल्या प्राण्याच्या आवाजाचे कौतुक करावे .
  - मुलांना प्राण्यांचे आवाज काढण्यासाठी प्रेरित करावे.

दिवस - २१

क्षेत्र – :श्रवण – भाषण,संभाषण

संकल्पना /संबोध -:वस्तूबद्दल बोलणे

- **जाणून घेऊया -:**
  - शिक्षक / पालक यांनी मुलांच्या परिचयाच्या वस्तू दाखवाव्यात .त्यावर गप्पा माराव्यात.
  - वस्तूबद्दल प्रश्न विचारावेत.१.उदा.या वस्तूला काय म्हणतात.२.ही वस्तू कोठे पाहिलीस?
- **सक्षम होऊया -:**
  - शिक्षक पालक,यांनी परिचयाच्या वस्तू दाखवून त्याबद्दल माहिती सांगण्यास सांगावे.
  - वस्तूच्या रंग, रूप याबद्दल चर्चा करावी, त्यांना बोलते करावे.
- **सराव करूया -:**
  - वेगवेगळ्या चालीत बडबडगीतांचे गायन करावे.
  - मुलांना आवडणाऱ्या वस्तूंची यादी सांगण्यास सांगावी.
  - घरातील वस्तूबद्दल माहिती सांगण्यास सांगावी.

दिवस – २२

क्षेत्र – :भाषण – संभाषण

संकल्पना /संबोध-: पाठ्यपुस्तकातील पावसाच्या गीताचे गायन

- **जाणून घेऊया -:**
  - शिक्षकांनी,पालकांनी मुलांना पाठ्यपुस्तकातील पावसाच्या गीताचे गायन करून दाखवावे.
  - पावसाविषयी माहिती विचारावी. मुलांना इतर पावसाची गाणी गाण्यास सांगावी उदा.येरे येरे पावसा
- **सक्षम होऊया -:**
  - वेगवेगळ्या चालीत पावसाची गाणी गावीत.
  - शिक्षक पालकांनी पावसाच्या गीतांची ऑडीओ ऐकवावी.
- **सराव करूया -:**
  - शिक्षक,पालक यांनी मुलांना पावसाच्या गाण्याचे गायनासह सादरीकरण करून दाखवण्यास सांगावे.
  - शिक्षक पालकांनी पावसाच्या गीतांची व्हिडीओ दाखवावा.

दिवस – २३

क्षेत्र – :श्रवण– भाषण, संभाषण

संकल्पना /संबोध -:चित्र दाखवून संवाद घडवणे

- **जाणून घेऊया -:**
  - मुलांना परिचयाचे चित्र दाखवावे .त्यातील तपशील विचारावा.उदामित्रासोबतचा. संवाद
  - चित्राबद्दल प्रश्न विचारावेत. उदा. चित्रामध्ये कोण कोण आहे ?
- **सक्षम होऊया -:**
  - शिक्षक पालक,यांनी विद्यार्थ्यांना परिचयाची चित्रे दाखवून त्याबद्दल माहिती सांगण्यास सांगावे.
  - चित्राबद्दल चर्चा करावी.त्यांना बोलते करावे.त्यावर गप्पा माराव्यात.
  - भाजी विक्रेत्याचा संवाद,किरण दुकानदाराचा संवाद,आई मुलाचा संवाद चित्र दाखवून घडवून आणावा.
- **सराव करूया -:**
  - पाठ्यपुस्तकातील चित्रांवर चर्चा करावी.
  - पाठ्यपुस्तकातील चित्रांवर गप्पा माराव्यात .

दिवस – २४

क्षेत्र – :भाषण – संभाषण
संकल्पना /संबोध-: चित्र काढून त्यावर बोलणे

- **जाणून घेऊया -:**
  - शिक्षकांनी,पालकांनी मुलांना आवडीची चित्रे दाखवावीत.
  - शिक्षकांनी,पालकांनी मुलांना आवडीची चित्रे काढण्यास सांगावी.
- **सक्षम होऊया -:**
  - विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्रांवर गप्पा माराव्यात.
  - विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्रांवर बोलण्यास सांगावे.
- **सराव करूया -:**
  - शिक्षक,पालक यांनी विद्यार्थ्यांना काढलेल्या चित्रांवर संवाद सादर करण्यास सांगावे .
  - विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्रांचे कौतुक करावे.

दिवस – २५

क्षेत्र – :श्रवण– भाषण, संभाषण
संकल्पना /संबोध -:घटनाक्रम सांगणे .

- **जाणून घेऊया -:**
  - विद्यार्थ्यांना पाककृती कशी तयार करतात याबद्दल.चर्चा करावी.उदा .मुलांना चहा कसा तयार करतात.याबद्दल विचारावे.
  - मुलांनी सांगितलेल्या पाककृतीबद्दल शिक्षक,पालक यांनी पुन्हा घटना क्रमाने सांगाव्यात.
- **सक्षम होऊया -:**
  - मुलांना भाकरी तयार करणेभाजी करणे याचा घटना,क्रम सांगण्यास लावावा.
  - त्यांच्या जीवनभवातील घटनांबद्दल चर्चा करावीमुलांना घटना क्रमाने सांगण्यास अडचण आल्यास . .पालकांनी मदत करावी,शिक्षक
- **सराव करूया -:**
  - कालचा घटनाक्रम विचारावा.

दिवस – २६

क्षेत्र – :भाषण – संभाषण
संकल्पना /संबोध -:अनौपचारिक गप्पा

- **जाणून घेऊया -:**
  - शिक्षकांनी,पालकांनी विषय न ठरवता मुलांना बोलते करावे.
  - मुलांच्या आवडीच्या,भावविश्वातील बाबींची निवड करावी.त्यावर बोलते करावे.
- **सक्षम होऊया -:**
  - कोणत्याही विषयावर मुलांना बोलण्यासाठी प्रेरित करावे.
  - विद्यार्थ्यांना बोलताताना मदत करावी.
- **सराव करूया -:**
  - विषय न ठरवता मुलांशी गप्पा माराव्यात.
  - मुलांच्या बोलण्याचे कौतुक करावे.

दिवस – २७

क्षेत्र – :श्रवण– भाषण, संभाषण
संकल्पना /संबोध -: औपचारिक गप्पा

- **जाणून घेऊया -:**
  - विद्यार्थ्यांना पाककृती कशी तयार करतात याबद्दल.चर्चा करावी.उदा .मुलांना चहा कसा तयार करतात याबद्दल.विचारावे.
  - मुलांनी सांगितलेल्या पाककृतीबद्दल शिक्षक,पालक यांनी पुन्हा घटना क्रमाने सांगाव्यात.
- **सक्षम होऊया -:**
  - मुलांना भाकरी तयार करणे भाजी करणे याचा घटना,क्रम सांगण्यास लावावा.
  - त्यांच्या जीवनभवातील घटनांबद्दल चर्चा करावी मुलांना घटना क्रमाने सांगण्यास अडचण आल्यास. शिक्षक / पालकांनी मदत करावी.
- **सराव करूया -:**
  - कालचा घटनाक्रम विचारावा.

दिवस – २८

क्षेत्र – :भाषण– संभाषण

संकल्पना /संबोध -:अपूर्ण गोष्ट पूर्ण करणे .

- **जाणून घेऊया -:**
  - शिक्षकांनी,पालकांनी विविध गोष्टी सांगाव्यात.
  - मुलांच्या आवडीच्या,भावविश्वातील गोष्टीची निवड करावी.त्यावर चर्चा करावी.
- **सक्षम होऊया -:**
  - मुलांना गोष्टीची सुरुवात सांगून पुढील गोष्ट पूर्ण करण्यास सांगावी
  - प्रत्येक मुलाला पुढील एक एक वाक्य विचारत गोष्ट पूर्ण करावी.
  - गोष्ट पूर्ण करताना आवश्यक तेथे मुलांना मदत करावी.
- **सराव करूया -:**
  - एक जंगल होते.जंगलात अचानक पाऊस सुरु झाला ..पुढील गोष्ट तयार करण्यास मुलांना प्रेरित करावे.
  - मुलांना गोष्टीची सुरुवात,शेवट काय होईल हे विचारावे.

दिवस – २९

क्षेत्र – :भाषण– संभाषण

संकल्पना /संबोध -:नाट्यीकरण

- **जाणून घेऊया -:**
  - विद्यार्थ्यांना नाट्यीकारणाचा नमुना व्हिडीओ दाखवावा.
  - विद्यार्थ्यांना नाट्यीकारणातील संवाद म्हणून घ्यावेत.
- **सक्षम होऊया -:**
  - मुलांना एखाद्या विषयावर संवाद देऊन वाचून घ्यावेत.
  - त्या संवादाचे नाट्यीकरण घ्यावे.
- **सराव करूया -:**
  - घरातील आई-वडील ,बहिण – भाऊ यांच्याबरोबर नाट्यीकरण घ्यावे,

दिवस – ३०

सेतू अभ्यास चाचणी क्रमांक १

शाळेचे नाव: --

विद्यार्थ्याचे नाव : --

इयत्ता --तिसरी **विषय -मराठी** **गुण १०**

दिनांक / / २०२१

१] ऐका व लिहा (श्रुतलेखन) **गुण – २**

(शिक्षकांनी दोन सोपे शब्द सांगावेत व मुलांना ऐकून लिहण्यास सांगावे.)

जसे – मामा, ताई, दादा

२) चित्र पहा व प्राणी ओळखा . **गुण – २**

----

३) चहा तयार करण्यासाठी काय काय साहित्य लागते ते लिहा. गुण – १

____

४) पावसात खेळताना काय मजा येते ते लिहा. गुण – १

____

५) तुझ्या आवडीचे पावसाचे गाणे म्हण. गुण – १

६) खालील घटना क्रमाने लिहा. गुण -२

I. दिनू शाळेतून घरी आला.
II. आज शाळेत गणिताच्या तासाला सगळे खूप खुश होते.
III. तासाची मजा आईला लगेच सांगायची या विचारात दिनू दप्तर भरू लागला.

____

____

____

७) तुझ्या आवडीची गोष्ट सांग. गुण – १

दिवस – ३१

क्षेत्र – :भाषण – संभाषण
संकल्पना /संबोध -:अपूर्ण गोष्ट पूर्ण करणे .

- **जाणून घेऊया -:**
  - शिक्षकांनी,पालकांनी विविध गोष्टी सांगाव्यात.
  - मुलांच्या आवडीच्या,भावविश्वातील गोष्टीची निवड करावी.त्यावर चर्चा करावी.
- **सक्षम होऊया -:**
  - मुलांना गोष्टीची सुरुवात सांगून पुढील गोष्ट पूर्ण करण्यास सांगावी
  - प्रत्येक मुलाला पुढील एक एक वाक्य विचारत गोष्ट पूर्ण करावी.
  - गोष्ट पूर्ण करताना आवश्यक तेथे मुलांना मदत करावी.
- **सराव करूया -:**
  - एक जंगल होते.जंगलात अचानक पाऊस सुरु झाला. पुढील गोष्ट तयार करण्यास मुलांना प्रेरित करावे.
  - मुलांना गोष्टीची सुरुवात,शेवट काय होईल हे विचारावे.

दिवस – ३२

क्षेत्र – :भाषण– संभाषण
संकल्पना /संबोध -:नाट्यीकरण

- **जाणून घेऊया -:**
  - विद्यार्थ्यांना नाट्यीकारणाचा नमुना व्हिडीओ दाखवावा.
  - विद्यार्थ्यांना नाट्यीकारणातील संवाद म्हणून घ्यावेत.
- **सक्षम होऊया -:**
  - मुलांना एखाद्या विषयावर संवाद देऊन वाचून घ्यावेत.
  - त्या संवादाचे नाट्यीकरण घ्यावे.
- **सराव करूया -:**
- घरातील आई-वडील ,बहिण – भाऊ यांच्याबरोबर नाट्यीकरण घ्यावे,

दिवस – ३३

क्षेत्र – :भाषण – संभाषण

संकल्पना /संबोध-: आवडीच्या खेळाबद्दल माहिती सांगणे .

- **जाणून घेऊया -:**
  - शिक्षकांनी,पालकांनी मुलांना आवडीच्या खेळाची नावे विचारावीत.
  - खेळावर चर्चा करावी.त्यावर चर्चा करावी.
- **सक्षम होऊया -:**
  - मुलांना आवडीच्या खेळाचे चित्र काढण्यास सांगावे.
  - विद्यार्थ्यांना खेळातील नियमाबद्दल चर्चा करावी.
- **सराव करूया -:**
  - गावात,गल्लीत कोणकोणते खेळ खेळले जातात.
  - मुलांना गोष्टीची सुरुवात,शेवट काय होईल हे विचारावे.

दिवस – ३४

क्षेत्र – :भाषण– संभाषण

संकल्पना /संबोध -:चित्र गप्पा

- **जाणून घेऊया -:**
  - विद्यार्थ्यांना परिचयाचे चित्र दाखवावे.त्यातील तपशीलाचे बारकाईने निरीक्षण करण्यास सांगावे.
  - विद्यार्थ्यांना चित्रातील तपशीलवार प्रश्न विचारावेत.
- **सक्षम होऊया -:**
  - विद्यार्थ्यांसोबत चित्रावर गप्पा माराव्यात त्यातील पात्रे काय बोलत .चित्रातील पात्रांबद्दल विचारावे. असतील त्या संवादाचे नाट्यीकरण घ्यावे.
  - मुलांना चित्रावर बोलते करावे.गप्पा माराव्यात.
- **सराव करूया -:**
  - पाठ्यपुस्तकातील चित्रांवर गप्पा माराव्यात.

दिवस – ३५

क्षेत्र – :भाषण – संभाषण
संकल्पना /संबोध-: शाळेबद्दल,स्वत:बद्दल बोलणे .

- **जाणून घेऊया -:**
  - शिक्षकांनी,पालकांनी मुलांना स्वतची: माहिती विचारावी.त्याबद्दल मुलांना प्रश्न विचारून बोलते करावे . उदा तुझे नाव.काय ? तुला कोणता रंग आवडतो.इत्यादी ?
  - शिक्षकांनी,पालकांनी मुलांना परिसरातील इतर शाळेबद्दल माहिती सांगावी.
- **सक्षम होऊया -:**
  - मुले स्वत:ची माहिती सांगत असताना अडखळल्यास त्यांना मदत करावी.स्वत:बद्दल, शाळेबद्दल मुक्तपणे व्यक्त होऊ द्यावे.
  - त्यांना बोलण्यासाठी प्रेरणा द्यावी.
- **सराव करूया -:**
  - मुलांना शाळेचे चित्र दाखवून त्यांना माहिती सांगण्यास सांगावे.

दिवस – ३६

क्षेत्र – :भाषण– संभाषण
संकल्पना /संबोध -:चित्रवर्णन

- **जाणून घेऊया -:**
  - विद्यार्थ्यांना परिचयाचे चित्र दाखवावे.त्यातील तपशीलाचे बारकाईने निरीक्षण करण्यास सांगावे .विद्यार्थ्यांना चित्रातील तपशीलवार प्रश्न विचारावेत.
  - शिक्षक,पालक यांनी मुलांना चित्राचे वर्णन करून दाखवावे.
- **सक्षम होऊया -:**
  - विद्यार्थ्यांना परिचयाची चित्रे दाखवावी.त्याचे वर्णन करण्यास सांगावे.
  - चित्रांवर काही प्रश्न विचारावेत.मुलांना बोलते करावे.
- **सराव करूया -:**
  - पाठ्यपुस्तकातील चित्रांचे वर्णन करून घ्यावे.

दिवस – ३७

क्षेत्र-वाचन

संकल्पना/ संबोध : चित्रवर्णन, चित्रवाचन

○ जाणून घेऊ या -:

- ○ विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे.
- ○ त्यांना माहीत असणाऱ्या फळांची नावे विचारावी.

○ सक्षम होऊ या

- ○ दिलेल्या चित्रांची नावे ओळखल्यानंतर त्यावर आधारित अधिक प्रश्न चित्राचे वाचन करून विचारावे.

१) या फळाचा रंग कोणता आहे?

२) तुम्हाला कोणते फळ सर्वात जास्त आवडते ? का आवडते ?

● सराव करू या



- ○ शेजारी दिलेल्या चित्रातील फळे ओळखा . फळे दाखवा.
- ○ फळांच्या आकारावरून फळांचा सर्वात लहान ते सर्वात मोठा असा क्रम लावा.
- ○ आपल्या गावामध्ये / शहरामध्ये कोणती फळे मिळतात ते सांगा.
- ○ चित्रांतील फळांपैकी कोणते फळ एकत्रित डझनामध्ये मिळते?

दिवस – ३८

क्षेत्र-वाचन

संकल्पना -: संबोध/कथावाचन

- **जाणून घेऊ या -:**

मांजराची गंमत ही चित्रकथा मुलांना दाखवावी.

चित्रकथेतील पात्रांविषयी मुलांसोबत चर्चा करावी. तसेच मुलांना चित्रकथेचे निरीक्षण करण्यास सांगावे.

1.खालील चित्रांचे निरीक्षण करा?चित्रात काय दिसते ते सांगा,

2.तुम्हाला गोष्टी ऐकायला आवडतात काय?

3.शाळेला सुट्टी असतांना तुम्ही गोष्टी ऐकल्या का?कोणाकडून ऐकल्या?

- **सक्षम होऊ या-:**

○ शिक्षकांनी मुलांना चित्रे क्रमाने दाखवावी व त्यावरून चित्रकथा वाचण्यास प्रोत्साहित करावे.

(1 प्रत्येक चित्रात काय दिसते ते विचारावे.

(2 एकेक चित्रातील प्राणी प्रसंग यांची, ओळख करून दयावी .

(3 चित्रांवरून गोष्टींचा क्रम विद्यार्थ्यांकडून लावून घ्यावा.

(4 विद्यार्थ्यांना गोष्ट सांगायला लावावी. अडेल तिथे त्याना मदत करावी .

- **सराव करू या-:**

1) चित्रकथेत येणारे नवीन शब्द फळ्यावर लिहून त्यांचे वाचन करून घ्यावे.
2) घरातील वस्तूंची नावे विचारावी.
3) शब्द वाचनाचा सराव घ्यावा.
4) गोष्टीचा शेवट यापेक्षा वेगळा होऊ शकतो का यासारखे?तुम्हाला काय वाटते?प्रश्न विचारावे.

दिवस – ३९

क्षेत्र-वाचन

संकल्पना-: संबोध/ चित्राच्या जागी शब्द वापरून पाठवाचन

- **जाणून घेऊ या -:**

○ विद्यार्थ्यांना एकेक चित्राचे निरीक्षण करायला सांगावे मुली कोणते खेळ खेळत आहेत ते /चित्रातील मुले. .त्यावर चर्चा करावी.विचारावे

- **सक्षम होऊ या-:**

- पाच मुले खेळत आहेत. त्यांच्याजवळ चेंडू फळी आहे.
- मुली .खेळत आहेत _______
- मुले- मुली खेळत आहेत.
- मुले .खेळत आहेत_______

(1मजकूर वाचत असताना चित्रांच्या जागी कोणता शब्द घालता येईल यावर चर्चा घडवून आणावी.

(2 गरजेनुसार मुलांकडून पूर्ण मजकुराचे वाचन करून घ्यावे.

३(चित्रांची अदला.वाक्ये बनवायला सांगावी बदल करून नवीन-

- **सराव करू या -:**

- खेळांची माहीती झाल्यावर कोणाला कोणता खेळ जास्त आवडतो ते विचारावे.
- तुम्हाला आवडणारा खेळ खेळणाऱ्या खेळाडूचे नाव विचारावे.
- फलकावर वरील चित्रातील खेळांसोबत वर्गातील विद्यार्थ्यांची नावे घालून वाचावी. ती लिहून काढावी.

दिवस – ४०

क्षेत्र-वाचन

संकल्पना-: संबोध/ व्यावसायिकाला प्रश्न विचारणे

- **जाणून घेऊ या -:**

  - विद्यार्थ्यांना आई बाबा किंवा नातेवाइकांसोबत दुकानात गेल्यानंतर-आलेला अनुभव कथन करण्यास सांगावे .
  - एखाद्याकडून माहिती मिळवण्यासाठी आपण काय करतो.यावर चर्चा करावी ?

- **सक्षम होऊ या -:**

  - शिक्षकाने दिलेल्या चित्रातील व्यावसायिकाला कोणते प्रश्न विचारायचे आहेत याची.तयारी करून ठेवावी.
  - वर्गात एखाद्या मुलाला दुकानदाराची भूमिका द्यावी तीन प्रश्न विचारून-शिक्षकांनी सुरुवातीला दोन. .नंतर मुलांना प्रश्न विचारण्यास सांगावे



(1 हे कशाचे चित्र आहे?

(2 चित्रात काय दिसत आहे?

(3 किराणा मालाचे दुकानात कोणकोणत्या वस्तू मिळतात?

(4 तुम्ही दुकानातील माल कोठून विकत आणता?

- **सराव करू या -:**

  - किराणा दुकानात मिळणाऱ्या सामानाची, वस्तूंची यादी करा.
  - आणखी एखाद्या व्यावसायिकाला प्रश्न विचारण्याचा सराव करा.

दिवस- ४१

क्षेत्र- वाचन

संकल्पना/ संबोध : कविता वाचन

- **जाणून घेऊया**

- शिक्षकांनी कवितेचे तालासुरात .साभिनय सादरीकरण करावे,
- विद्यार्थी कविता लक्षपूर्वक ऐकतील.
- विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे.
- चित्रातील भाज्यांची नावे विचारा. गाण्याची एकेक ओळ म्हणावी कृती,करावी.
- प्रत्येक ओळीचा पुरेसा सराव घ्यावा.



- **सक्षम बनू या-:**
  - शिक्षकांनी विध्यार्थ्यांना कवितेस विविध चाली लावण्याचा प्रयत्न करण्यास सांगावे .
  - पद्य वाचन आणि गद्य वाचन यात काय काय फरक आहे हे कविता गायन घेऊन विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावे .
- **सराव करू या**
  - भाज्यांच्या नामपट्ट्या तयार कराव्यात. त्यांच्या वाचनाचा सराव करून घ्यावा .
  - भाज्या खाण्याच्या गरजेबाबत, आवडीनिवडीबाबत विद्यार्थ्यांशी गप्पा माराव्या .

दिवस- ४२

क्षेत्र – वाचन

संकल्पना/ संबोध : शब्द डोंगर

- **जाणून घेऊया -:**
  - शिक्षक विद्यार्थ्यांना चित्रशब्द कार्डांची ओळख करून देतात. तसेच चित्रांच्या सहाय्याने शब्द वाचनाचा सराव घेतात.
  - विद्यार्थ्यांनी वाचलेला शब्द फळ्यावर लिहितील.

- **सक्षम बनू या -:**
  - शिक्षक वर्गात फलकावर एक शब्द देतील आई.उदा .
  - त्याच शब्दात आणखी एक.एक शब्द वाढवत वाक्य तयार करण्यास लावतील-

उदा : आई

माझी आई

ही माझी आई

ही माझी आई आहे

- **सराव करू या -:**
  - विद्यार्थी वर्गात एकमेकांशी चर्चा करतील.
  - कोणता शब्द सांगावा व कोणता नाही याचा विचार करतील व सांगतील.
  - शब्द डोंगर तयार करण्याचा प्रयत्न करतील.

दिवस- ४३

क्षेत्र – वाचन

संकल्पना / संबोध : प्रकट वाचन

- **जाणून घेऊया -:**
  - शिक्षकांनी दिलेल्या पाठाचे,.कथेचे अचूक उच्चारासह व सुस्पष्ट आवाजात प्रकटवाचन करावे/
  - विद्यार्थी लक्षपूर्वक ऐकतील .
  - विद्यार्थी प्रकटवाचन करतील.

- **सक्षम बनू या -:**

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रकटवाचनासाठी बालसाहित्य उपलब्ध करून द्यावे. ग्रंथालय येथे मुलांच्या,वर्गातील वाचन कोपरा. वयोगटानुसार यांची पुस्तक कविता चित्रे,कथा,आवडीनुसार, उपलब्ध करून द्यावीत.

“ मुलांना शिकविते, मी आहे शिक्षिका.”

“ जनतेचे रक्षण करतो, मी आहे पोलीस.”

“ आजाऱ्याची सेवा करतो, मी आहे डॉक्टर.”

“ मुलांना हसवितो, मी आहे जोकर.”

“ देशाचे रक्षण करतो, मी आहे सैनिक.”

- **सराव करू या -:**
  - विद्यार्थ्यांना प्रकट वाचनाची संधी द्यावी.
  - वाचनात येणारे अडथळे दूर करण्यासाठी मुलांना मदत करावी.
  - चित्रात आणखी कोण.ते विचारावे?दिसत आहेत कोण-
  - चित्रातील शेतकरी काय म्हणेल ते विचारावे.

दिवस- ४४

क्षेत्र : वाचन

संकल्पना /संबोध : दिनदर्शिका / तक्ता वाचन

• जाणून घेऊया -:

02.15 03.55 07.15 11.45 18.50 20.25 23.40

Train No.	Train Name	Day	Dept.	Tra N
12119	Amravati-Ajni Intercity	Mon./Tue./Wed./Thur./Fri.	05.30	121
12766	Amravati-Tirupati Express	Mon./Thur.	06.55	127
59026	Amravati-Surat Fast Psngr.	Mon./Fri./Sat.	09.00	59
51184	Amravati-Bhusaval Psngr.	Daily	13.00	51
51261	Amravati-Nagpur Psngr.	Daily	15.30	51
12159	Amravati-Jabalpur Express	Mon./Wed./Sat.	17.45	12
12112	Amravati-Mumbai Expr	Daily	19.05	12
11406	Amravati-Pune Express	Mon./Sat.	18.30	11

शिक्षकांनी मुलांना रेल्वेचे वेळापत्रक दाखवा व त्यावर आधारित प्रश्न विचारावेत.

(1तुम्ही रेल्वे ने प्रवास केला आहे काय ?

(2हे चित्र कशाचे आहे?

३(याचा आपल्याला काय उपयोग होतो?

४) रेल्वेचे वेळापत्रक नसेल तर काय होईल ?

५) आपल्या वर्गाचे वेळापत्रक आहे काय ?

• सक्षम बनू या -:

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिनदर्शिका दाखववी.

(1 तुमच्या घरी तुम्ही अशी दिनदर्शिका पाहिली आहे का?

(2या दिनदर्शिकेतून आपल्याला काय माहिती मिळते?

(3वार कोठे लिहिले आहेत?

(4महिना कोठे लिहिला आहे?

(5२६ तारखेचा वार कोणता आहे?

(6 रविवारी कोणत्या तारखा आहेत ?

• सराव करू या -:

- शिक्षक विद्यार्थ्यांकडून दिनदर्शिकेचे वाचन करून घेतील.
- आपल्या वर्गातील सर्व मुला-मुलींचे वाढदिवस दिनदर्शिकेवर दाखवा. कोणाच्या वाढदिवशी कोणता वार येतो ते लिहा.

दिवस–४५

सेतू अभ्यास चाचणी क्रमांक ३

शाळेचे नाव : --

विद्यार्थ्याचे नाव : --

इयत्ता **तिसरी--** **विषय** **मराठी-** **गुण २०**

दिनांक / २०२१ /

१) को .को कोंबडा ही कविता साभिनय म्हणून दाखवा- गुण 2

२) खालील शब्द कार्ड पहा व सारख्या अक्षरांना गोल करा गुण 2

आई आजी आबा आग

३ विद्यार्थ्यांना खालील प्रश्न(विचारावे. गुण 2

अ(तुझे पूर्ण नाव काय आहे?

ब (तुला कोणता खेळ आवडतो?

४ 5 गुण ?खाली दिलेल्या चित्रातील फळ व त्यांची नावे यांच्या जोड्या लावा (

अननस पपई चिकू सफरचं पेरू

५ अर्थपुर्ण शब्द बनवा ३ खालील चित्र पहा व चित्रावरून (गुण 3

1)________________

2)________________

3)________________

६ .खालील चित्राचे निरीक्षण करा व विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या (गुण 3

(विचारलेल्या चार प्रश्नांपैकी किमान तीन प्रश्नांची बरोबर उत्तरे असतील तर पूर्ण गुण द्यावे)

अ) मुले कोणता खेळ खेळत आहेत ?

आ) खेळामध्ये किती मुले सहभागी आहेत?

इ) वरील खेळ खेळण्यासाठी कोणते साहीत्य हवे?

ई) मैदानावर असे आणखी कोणकोणते- खेळ खेळता येतील?

७ ?पुढील उतारा वाचा व विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या (गुण 3



घटक १.६

काचेचा कप

कप कप काचेचा कप
कपात काय?... चहा.
मेघनाचा का नयनाचा?... नयनाचा.

कप कप काचेचा कप.
कपात काय?... ताक.
मेघनाचे का नयनाचे?... मेघनाचे.

मुलांनी मजकूर वाचल्यावर विचारण्याचे प्रश्न – १) कप कशापासून बनविला आहे?
२) चहा कोणाला आवडतो?
३) मेघनाला प्यायला काय आवडते?